SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004, MAHARASHTRA
PHONE : EPABX – 2609000, Phone No. 0231-2609296/9139
www.unishivaji.ac.in, Email ID : , pgbutr3@unishivaji.ac.in

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर -४१६००४ महाराष्ट्र

दूरध्वनी –ईपीएबीएक्स -२६०९०००, फोन नं. ०२३१-२६०९२९६/९१३९,
www.unishivaji.ac.in, : pgbutr3@unishivaji.ac.in

Estd. 1962
"A++" Accredited by NAAC(2021) With CGPA 3.52

संदर्भ क्र. :– एस.यु./पीजीबीयुटीआर/प्रवेश प्रक्रिया /2898 दिनांक : 11 SEP 2024

प्रति,

1) मा. अधिविभागप्रमुख,
सर्व पदव्युत्तर अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर.

2) मा. प्राचार्य / संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये / मान्यताप्राप्त
संस्था / स्वायत्त संस्था, शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर.

**विषय :– पीएच.डी. मान्यताप्राप्त मार्गदर्शकांकडुन युजीसी पीएच.डी. रेग्युलेशन 2022 नियम 6 (1) नुसार प्रवेश क्षमता कळविणेबाबत.**

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयसंदर्भात आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष 2024–2025 करिता मान्यताप्राप्त पीएच.डी. संशोधन मार्गदर्शकांकडून रिक्त प्रवेश क्षमता मागविण्यात येत आहे. सदर प्रवेशक्षमता Online Form मध्ये दिनांक **11/09/2024 ते दि. 20/09/2024** अखेर भरून द्यावयाची आहे.

**ज्या शिक्षकांची नियुक्ती विद्यापीठ अधिविभाग/ सलंग्नित पदव्युत्तर महाविद्यालय येथे पुर्णवेळ पदवी व पदव्युत्तर शिक्षक म्हणुन झालेली आहे, फक्त अशाच मान्यताप्राप्त मार्गदर्शकांनी प्रवेश क्षमता कळवावी.**

1. यासंदर्भात पीएच.डी. प्रवेश माहिती पुस्तिका मधील आर. आर. डी. 9 मधिल खालील तरतूदी अवलोकनी घेण्यात याव्यात.

R.R.D.9. RESEARCH SUPERVISOR/GUIDE:

9.7. An eligible Professor/Associate Professor/Assistant Professor can guide up to eight (8) / six (6) / four (4) Ph.D. scholars, respectively, at any given time
Each supervisor can guide up to two international research scholars on a supernumerary basis over and above the predetermined number of Ph.D. scholar as specified in above clause. At any point, the total number of Ph.D. scholars under a faculty member, either as a supervisor or co-supervisor, shall not exceed the number prescribed in above clause.

9.9 Faculty members with less than three years of service before superannuation shall not be allowed to take new research scholars under their supervision. However, such faculty members can continue to supervise Ph.D. scholars who are already registered until superannuation and as a co-supervisor after superannuation, but not after attaining the age of 70 years

9.12 A seat will be considered vacant for admission purpose after the declaration of final result of the student by Shivaji University, Kolhapur or after six months from the date of submission of final Thesis/Dissertation, whichever is earlier.

2. दि. 7 नोव्हेबर 2022 रोजीच्या यु.जी.सी. पीएच.डी रेग्युलेशनमध्ये नमुद केलेनुसार पीएच.डी. संशोधक विद्यार्थी यांची संख्या शिक्षकांच्या पदानुसार असल्याने, संशोधन मार्गदर्शकांनी त्या प्रमाणातच प्रवेश क्षमता कळवावी.

3. विद्यापीठ अनुदान आयोगाने दि. 07 नोव्हेंबर, 2022 रोजीच्या राजपत्रामध्ये मुद्दा क्रं. 6 (1) अन्वये संशोधन मार्गदर्शक मान्यतेसंदर्भात नमूद केलेले नियम विहीत केलेले आहेत. या अनुषंगाने विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार सर्व संबंधित मार्गदर्शक यांनी खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून आर. आर.डी. 9 नुसार प्रवेश क्षमता कळवावी.

   1. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि. 07 नोव्हेंबर, 2022 च्या अधिसूचनेमधील संशोधन मार्गदर्शक मान्यतेसदर्भातील तरतुदीनुसार अर्जदार अध्यापक नियमित स्वरूपात ज्या महाविद्यालयात कार्यरत आहे त्या महाविद्यालयात संबंधित विषय हा पदव्युत्तर स्तरावर शिकविला जात असेल तरच संबंधित विषयात संशोधन मान्यता प्राप्त मार्गदर्शकांनी संशोधक विद्यार्थी घेणेसाठी प्रवेश क्षमता कळवावी.

   2. विद्यापीठ अनुदान आयोगाची दि. 07 नोव्हेंबर, 2022 ची अधिसूचना निर्गमित होण्यापूर्वी ज्या अध्यापकांना त्यांच्या महाविद्यालयात संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम शिकविला जात नाही तरीही संशोधन मार्गदर्शक म्हणून मान्यता दिलेली आहे ती त्यांना नवीन विद्यार्थी न घेण्याच्या अटीवर सुरू ठेवण्यात येत आहे.

3. त्याचप्रमाणे विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि. 07 नोव्हेंबर, 2022 रोजीच्या अधिसूचनेनंतर ज्या अध्यापकांना, ते कार्यरत असलेल्या महाविद्यालयांत संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम शिकविला जात नाही, तरीही संशोधन मार्गदर्शक म्हणून मान्यता दिलेली आहे अशा अध्यापकांनी ते कार्यरत असलेल्या महाविद्यालयात संबंधित विषयातील पदव्युत्तर अभ्यासक्रमास विद्यापीठाने सलंग्नीकरण दिल्याचा पुरावा सादर केल्यानंतरच त्यांना पीएच.डी. चे विद्यार्थी घेण्यास मुभा देण्यात येईल.

4. संशोधन मार्गदर्शक म्हणून मान्यता दिलेल्या अध्यापकांची संस्थेतर्गत इतर महाविद्यालयात बदली किंवा इतर महाविद्यालयात नव्याने नियुक्ती झाल्यास व अशा महाविद्यालयात संबंधित विषय पदव्युत्तर पदवी स्तरावर शिकविला जात नसल्यास वरील परिच्छेद कं. 2 प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

5. त्याचप्रमाणे संबंधित सर्व मान्यता प्राप्त मार्गदर्शक यांनी प्रवेश क्षमतेचा अर्ज भरत असताना महाविद्यालयात संबंधित विषयातील पदव्युत्तर अभ्यासक्रमास विद्यापीठाने सलंग्नीकरण दिल्याचा पुरावा (Upload) सादर केल्यानंतरच व त्याचबरोबर संबंधित शिक्षक हे पदव्युत्तर अभ्यासक्रम शिकवित असलेबाबत प्राचार्य यांचे स्वाक्षरीमार्फत हमीपत्र सादर (Upload) केल्यानंतरच त्यांची प्रवेश क्षमता 2024–2025 साठी ग्राहय धरण्यात येईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ऑनलाईन फॉर्म **http://sukapps.unishivaji.ac.in/onlineaffiliation/#/login** लिंकवर ठेवणेत आला आहे. तेंव्हा सदर फॉर्म हस्तलिखित भरू नये. ऑनलाईन फॉर्म भरत असताना Affiliation Portal मधून देण्यात आलेला login ID वापरावयाचा आहे. ज्या शिक्षकांचा login ID generate झालेला नाही, अशा शिक्षकांनी Affiliation Portal मधून त्यांच्या महाविद्यालयाच्या प्राचार्य / संचालक / अधिविभागप्रमुख यांचेकडून नव्याने login ID generate करून घेवून, ऑनलाईन अर्ज भरावयाचा आहे. अर्ज भरत असताना login ID Confirm करूनच अर्ज भरणे आवश्यक आहे. संबंधित पात्र संशोधन मार्गदर्शकांनी विहित मुदतीत ऑनलाईन फॉम भरणेची कार्यवाही करावी.

सदर परिपत्रक हे आपल्या अधिविभागामधील / महाविद्यालयामधील / संस्थेमधील सर्व मान्यताप्राप्त संशोधन मार्गदर्शक यांच्या निर्दशनास आणावे.

आपला विश्वासु,

(श्री. विलास एस. सोयम)
उपकुलसचिव

प्रत – संगणक केंद्र.